# विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय गणित दिवस साजरा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे गणित शास्त्रज्ञ रामानुजन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालयात भित्तीपत्रके व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या.

भित्तीपत्रिका स्पर्धेत हर्ष पवार, आविष्कार कांबळे, अभिजित कळके, श्रीधर जाधव, सुजाता भोगम यांनी यश संपादन केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्ष पवार, अनुष्का पवार, तृप्ती चौगुले यांनी अनुक्रमे प्रथम ते तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार केला. कार्यक्रमाचे नियोजन गणित विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी केले. प्रणाली मोरे, संध्या वाडीचरला, सानिका कळमकर यांनी सूत्रसंचालन केले. अर्पिता पाटीलने प्रास्ताविक, दिव्या साजणीकरने आभार मानले.

पुढारी
28.12.2024

# विवेकानंद महाविद्यालयात भित्तीपत्रिका व प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात



**कोल्हापूर :** येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे गणित शास्त्रज्ञ रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयात भित्तीपत्रके व प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात पार पडली.

**भित्तीपत्रिका स्पर्धेत:**
**हर्ष पवार** - बी.एस्सी.१ (प्रथम क्रमांक), अविष्कार कांबळे व अभिजीत कळके - बी.एस्सी. ३ (व्दितीय क्रमांक), श्रीधर जाधव व सुजाता भोगम - बी.एस्सी. ३ (तृतीय क्रमांक) तसेच

**प्रश्नमंजूषा स्पर्धेत:**
**हर्ष पवार** - बी.एस्सी.१ (प्रथम क्रमांक),अनुष्का पवार - बी.एस्सी.१ (व्दितीय क्रमांक), तृप्ती चौगुले - बी.एस्सी.१ (तृतीय क्रमांक) हे विजेते ठरले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन गणित विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात व महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्पिता पाटील हिने केले तर आभार दिव्या साजणीकर हिने मानले. सुत्रसंचालन प्रणाली मोरे, संध्या वाडीचरला व सानिका कळमकर यांनी केले. यावेळी प्रा. जी. बी. कोल्हे, प्रा. व्ही. बी. पाटील, प्रा. पी. पी. कुलकर्णी, प्रा. ए. एम. साठे व प्रा. एन. टी. तामगावे, बी.एस्सी व एम.एस्सी. (गणित)चे विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

# विवेकानंदमध्ये भित्तीपत्रिका व प्रश्नमंजूषा स्पर्धा संपन्न



कोल्हापूर (राष्ट्र गीत वृत्तसेवा) येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे गणित शास्त्रज्ञ रामानुजन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयात भित्तीपत्रके व प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन केले गेले.

यातील भित्तीपत्रिका स्पर्धेत-हर्ष पवार - बी.एस्सी., प्रथम-अविष्कार कांबळे व अभिजीत कळके - बी.एस्सी., व्दितीय क्रमांक-श्रीधर जाधव व सुजाता भोगम -बी.एस्सी. तृतीय क्रमांक आला. प्रश्नमंजूषा स्पर्धेत-हर्ष पवार-बी.एस्सी., प्रथम , अनुष्का पवार-बी.एस्सी., व्दितीय क्रमांक-तृप्ती चौगुले - बी.एस्सी.,तृतीय क्रमांक आला.

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन मा.प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा.प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांनी महाविद्यालयातील उपलब्ध साधन सामग्रीचा वापर करुन विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक वृत्ती वाढवावी व आपल्या ज्ञानात भर घालावी. असे मत मांडले. या कार्यक्रमाचे नियोजन गणित विभाग प्रमुख प्रा.एस.पी.थोरात व महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री. आर. बी. जोग यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्पिता पाटील हिने केले तर आभार दिव्या साजणीकर हिने मानले. सुत्रसंचालन प्रणाली मोरे, संध्या वाडीचरला व सानिका कळमकर यानी केले. या कार्यक्रमास प्रा.जी.बी.कोल्हे, प्रा.व्ही बी पाटील, प्रा पी पी कुलकर्णी, प्रा.ए.एम.साठे व प्रा एन टी तामगावे बी.एस्सी व एम.एस्सी.(गणित) चे विद्यार्थी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.